# Question Paper
## Set- I
**Std. – 10th EM**
**Subject – Marathi L.L.**



**Time : 3 Hrs.** **Marks : 80**

### विभाग १ : पठित गदय

**प्र.१ अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:** [७]

**१) एका शब्दात उत्तरे लिहा.** २

अ) लेखक कोणत्या साली साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते?

आ) लेखकानी शालींचे गाठोडे कोणाकडे ठेवले?

**२) योग्य पर्याय निवडून लिहा.** १

i) लेखकानी अशक्त, म्हाताऱ्या भिक्षेकऱ्याला दोन शाली दिल्या कारण ____________

अ) त्याची अन्नाची गरज भागवण्यासाठी आ) थंडीपासून रक्षण व्हावे म्हणून

इ) त्याचा सन्मान करावा म्हणून ई) लेखकाकडे शालींचा ढीग पडला होता म्हणून

ii) खालील कृती योग्य की अयोग्य ते लिहा. १

अ) लेखकानी भिक्षेकऱ्याला दोन शाली दिल्या.

आ) भिक्षेकरी शाली विकून दोन दिवस पोटभर जेवला.

मी २००४ साली मराठी साहित्य संमेलनाचा बिनविरोध अध्यक्ष झालो. तत्कालीन एक-दोन वर्षांत माझ्यावर शालींचा वर्षाव झाला. एवढ्या शाली जमत गेल्या, की माझ्या आठ बाय सहाच्या खोलीत त्यांना ठेवणेच शक्य नव्हते. मग मी सगळ्या शालींचे गाठोडे बांधून ते निकटवर्ती मित्राकडे ठेवले व त्या शाली वापरण्याचे वगैरे त्याला सर्वाधिकार दिले. बिचारा अतिप्रामाणिक! त्याच्याही छोट्या खोलीत त्याने ते सांभाळले.

हळूहळू मी सगळ्या शाली वाटून टाकल्या, गरीब श्रमिकांना!

याच सुमारास मी शनिवार पेठेतील ओंकारेश्वर मंदिराच्या पुलावर बहुधा रोज संध्याकाळी जात असे तेथील कट्ट्यावर बसणे मला आवडे. एक दिवस काय घडले, की कडक थंडीच्या दिवसात एक म्हातारा, अशक्त भिक्षेकरी कट्ट्याला लागूनच चिरगुटे टाकून व पांघरून कुडकुडत बसल्याचे मी पाहिले.

दुसऱ्या दिवशी मी दोन शाली घेऊन ओंकारेश्वराच्या कट्ट्यावर आलो. तो म्हातारा होताच. त्याला दोन्ही शाली दिल्या. त्याने थरथरत्या हातांनी मला नमस्कार केला.

पुढे चार-पाच दिवस मला काही कामांमुळे संध्याकाळी ओंकारेश्वराला जाण्यास उसंत लाभली नाही. त्यानंतर मी नेहमीप्रमाणे ये-जा करत राहिलो. मग एकदम त्या भिक्षेकरी वृद्धाची आठवण आली. तो नेहमीच्या ठिकाणी नव्हताच. तेथील पुलावर चक्कर मारावी म्हणून मी उठलो व पुलावरून चालू लागलो.

पुलाच्या जवळपास मध्यावर तो भिक्षेकरी म्हातारा दिसला. मी लगबगीने त्याच्याकडे गेलो. पाहतो तो काय, तीच तीन चिरगुटे अंगाखाली व अंगावर, तेच कुडकुडणे, तेच दीनवाणे जिणे!

मी म्हटले, "बाबा, तुम्ही मला ओळखले?"

त्याने नकारार्थी मान हलवली.

मग मीच म्हटले, "बाबा, पाच-सहा दिवसांपूर्वी मी तुम्हांला दोन शाली दिल्या होत्या. आठवते?"

यावर म्हातार खुलला व पुन्हा हात जोडून म्हणाला, “हे भल्या माणसा, तू लई मोठा! म्यास्नी शाली दिल्या! पण बाबा, म्या भिकाऱ्याला शाली कशा शोभतील? त्या शोभेपेक्षा पोटाची आग लई वाईट! मी शाली इकल्या व दोन – तीन दिवस पोटभर जेवून घेतलं बाबा! आमचं हे असलं बिकट जिणं! तुझं लई उपकार हायेत बाबा.”

**३) स्वमत :** ३

तुमच्या वस्तू दुस-यांना देण्यातील आनंद स्वत:च्या शब्दांत व्यक्त करा.

**प्र.१ आ) पुढील गदय़ उता-याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:** [७]

**१) आकृती पूर्ण करा:** २

सुमितने पावडेकाकांना विचारलेले चार प्रश्न –

→ (१)

→ (२)

→ (३)

→ (४)

“गेल्या मयन्यापतूर चालतच येत हुते; पन आता माज्या लेकांन एक सायकल दिलीया मला. तवा आता सायकलनं येते”, अशी अजून बरीच माहिती त्यानं भरली. आठवड्यातून सरासरी किती किलोमीटर फिरती होते? ही फिरस्ती तुम्ही कशी करता? आतापर्यंत किती झाडं तुम्ही लावली आहेत ?

रेखामावशी फिरायच्या पायीच, कधीतरी सायकलनं! त्यांच्या इवल्याशा झोपडीपुढेही त्यांनी दोन झाडे लावली होती. त्यांतलं एक लिंबोणीचं होतं; पण एवढी सगळी माहिती सुमित का घेतोय, तेच कुणाला कळेना. रेखामावशी तर फार गडबडून गेल्या. “आणि आता पाहा, या आहेत रेखामावशींच्या फूटप्रिन्टस...!” असं म्हणत त्यानं मोबाईलचं कसलंसं बटन दाबलं आणि स्क्रीनवर पायपुसणीच्या आकाराचा एक निळा चौकोन उमटला, अगदी आभाळाच्या निरभ्र तुकड्यासारखा! सगळे ‘आ' वासून पाहत होते आणि त्या निळ्या तुकड्याच्या मधोमध दोन पावलं उमटली...एकदम चंदेरी मढलेली आणि खाली इंग्रजीत शब्द उमटले...'सिल्व्हर फूटप्रिन्टस! दि मोस्ट क्लिन फूटप्रिन्टस!!'

“वाऽ पाहिलेत रेखामावशीचे पाय चंदेरी आहेत. एकदम स्वच्छ, झऱ्याच्या स्फटिक स्वच्छ पाण्यासारखे,” सुमित ओरडला. “हयाऽ हे भलतंच!'' रेखामावशींच्या पायाकडे पाहत पावडेकाका म्हणाले.

सुमितनं हलकेच पावडेकाकांच्या गोजि-या तळव्यांकडे पाहिले आणि म्हणाला, “काका, आपण तुमच्या पायाचं पाहूया का?''

“त्यात पाहयचं काय? हे बघ, माझे पाय किती स्वच्छ आणि मऊसूत आहेत...!'' पावडेकाका पाय सगळ्यांना दाखवत म्हणाले. “पण चला काय सांगतंय तुमचं ॲप, ते तरी पाहूया,” त्यांनी पुस्ती जोडली.

सुमितनं पावडेकाकांचा डेटा ॲपमध्ये भरायला सुरू केला.

“काका, आता तुम्ही कुठून आलात?''

“विश्रांतवाडीहून.''

“कसे?''

“अर्थातच, कारने.''

“वीस किलोमीटर कारने. तुम्ही एकटेच...!” सुमितची शंका

“हो, का?''


“अच्छा, पण काका आठवड्यातून तुमचं फिरणं किती होतं?''

“अरे, माझं ऑफिसच माझ्या घरापासून १६ किलोमीटर आहे. रोजचे पस्तीस-चाळीस किलोमीटर तर नक्कीच होतात.''

“आणि हे सगळं कारनं... तुम्ही एकटेच ये-जा करता?"
“हो, नाही तर काय बसला लटकत जाऊ म्हणतोस?” काका चिडून म्हणाले.
“काका, तुम्ही काही झाडं लावली आहेत का?”
“पावडेकाकूंनी कुंडीतल्या रोपांकरिता माती मागितली तर ती आणून देणं होत नाही काकांना, ते झाडं काय लावणार?”

स्नेहलनं एकदम स्ट्रेट ड्राईव्ह लगावला.

२) **शब्दजाल पूर्ण करा:** २





३) **स्वमत:** ३

‘फूटप्रिन्टस ॲप’ बद्दलचे तुमचे मत सांगा.

**अपठित गदय**

**प्र.१ इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **[४]**

१) **ओघतक्ता पूर्ण करा.** २




दोन विद्वान माणसांची गोष्ट सांगतात. त्यांतला एकजण एकदा दुस-याच्या भेटीला गेला. भेट झाली. त्यानंतर दोघेही आपापल्या जागी खुर्च्यांवर शांतपणे बसून राहिले. एकमेकांशी अवाक्षरही बोलले नाहीत. तासाभराने भेटीला आलेला विद्वान उठला आणि यजमानांचा निरोप घेताना हर्षभरित होऊन म्हणाला,
“वा वा ! किती मजेत वेळ गेला म्हणून सांगू !”
यजमान म्हणाले, माझाही वेळ फार छान गेला !”
एक तासभर शब्दही न बोलता संवादाचा आनंद मनसोक्त लुटणारे हे दोन विद्वान म्हणजे 'संवाद' या संकल्पनेची परमोच्च आदर्शावस्था म्हटली पाहिजे. दोन जिवलग, अध्यात्मक्षेत्रातील गुरुशिष्य, एकाच ध्येयाचा किंवा कलेचा

ध्यास घेतलेले उत्कट साधक हे असे ‘शब्देविण संवादिजे' या अवस्थेप्रत जाऊ शकतात.

(शांता शेळके)

**२) पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **२**

i) ‘शब्देविण संवादिजे' या अवस्थेपर्यंत कोण जाऊ शकतात?

ii) “वा वा! किती मजेत वेळ गेला म्हणून सांगू!” हे कोण कोणास म्हणाले ?

## विभाग २ : पदय

**प्र.२ अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **[८]**

**१) संकल्पना स्पष्ट करा.** **२**

i) आभाळाचे छत्र ______________.

ii) गर्भ रेशमी सळसळ ____________.

| | |
|---|---|
| फुला फुलांचे दाट ताटवे, जिथे पोचते दृष्टी<br>रंग मजेचे, रंग उदयाचे, जपून ठेवू सृष्टी.....<br><br>धान्य देईना संगणक हा, काळी आई जगवू<br>मातीमध्ये जे हात राबती, तयांस देऊ पुष्टी....<br>रंग मजेचे, रंग उदयाचे<br><br>उधळू, फेकू बिया डोंगरी, रूजतील देशी झाडे<br>गच्च माजतील राने, होईल आभाळातून वृष्टी...... | रंग मजेचे, रंग उदयाचे<br>डोंगरातून वाहात येते, खळाळते हे पाणी<br>फेनधवलशा तुषारांमध्ये, राहाल कैसे कष्टी?<br>रंग मजेचे, रंग उदयाचे<br><br>मिळेल पैसा, मिळेल दौलत, यंत्रांच्या संगती<br>आभाळाच्या छत्राखाली, एक अनोखी तुष्टी.....<br>रंग मजेचे, रंग उदयाचे<br><br>हिरवी हिरवी मने भोवती, किती छटा हिरव्याच्या<br>गर्भरेशमी सळसळण्याच्या जगास सांगू गोष्टी....<br>रंग मजेचे, रंग उदयाचे |

**२) चौकट पूर्ण करा.** **२**

i) जेथे दृष्टी पोहोचते असे ठिकाण : [ ]

ii) कवितेतील ‘यमक’ अलंकार साधणा-या शब्दांच्या जोड्या शोधा. [ ] [ ]

**३) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा.** **२**

अ) पुष्टी   ब) तुषार   क) दौलत   ड) तुष्टी

४) 'रंग मजेचे, रंग उदयाचे', या शीर्षकाची सार्थकता स्पष्ट करा. २

**प्र.२ आ) 'दोन दिवस' व 'हिरवंगार झाडासारखं' या दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.** [८]

१) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री - १

२) कवितेचा विषय - १

३) कवितेतून मिळणारा संदेश - २

४) कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण - २

५) कोणत्याही एका कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा - २

**दोन दिवस**

अ)हरघडी - ब) डोईवर - क) दारिद्र्य - ड) सहाय्य –

किंवा

**हिरवंगार झाडासारखं**

अ) संथ - ब) मुसाफिर - क) वस्त्र - ड) रक्त -

## विभाग ३ : स्थूलवाचन

**प्र.३ खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** [६]

१) 'जाता अस्ताला' या कवितेतील पुढील प्रतीकांचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

**सूर्य** व **पणती**

२) 'मोठे होत असलेल्या मुलांनो' या पाठाच्या आधारे 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते ते लिहा.

३) 'पाणी हेच जीवन!' या विधानासंबंधी तुमचे विचार लिहा.

## विभाग ४ : भाषाभ्यास

**प्र.४ अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.** [८]

**१) पुढील वाक्यांचा प्रकार ओळखा.** २

अ) मुलांनो, रांगेत चला. ब) बाबा नाशिकला गेले.

**२) कंसातील सूचनेनुसार वाक्य रूपांतर करा.** **२**

i) लठ्ठपणा काय आपल्या हातात आहे? ( विधानार्थी करा.)

ii) काही उपयोग होणार नाही त्याचा. ( प्रश्नार्थी करा. )

**३) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही २ )** **४**

i) हर्षभरित होणे ii) ध्यास घेणे iii) स्तंभित होणे

**प्र.४ आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.** **[८]**

**१) i) पुढील शब्दांचे समानार्थी शब्द ओळखून लिहा.** **१**

अ) अंधार - _________ (तम, प्रकाश, विनाश)

ब) आनन - _________ ( हात, तोंड, चेहरा )

**ii) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.** **१**

अ) पशू – पक्ष्यांबद्दलचे प्रेम - [ ]

**iii) विरूद्धार्थी शब्द लिहा.** **१**

अ) निस्वार्थी × ब) मित्र ×

**iv) पुढील शब्दांचे वचन बदला.** **१**

अ) तिकिट -

ब) भेट -

**२) लेखननियमानुसार लेखन** :

**i) अचूक शब्द ओळखा.** **२**

अ) जाज्वल्य, जाजवल्य, जाजव्ल्य, जाज्वलय

ब) कीरती, किर्ती, कीर्ती, किरथी

**३) विरामचिन्हे :**

**i) खालील वाक्यातील विरामचिन्हे ओळखा व त्यांची नावे लिहा.** **२**

अ) “अन्वर जेवला?” ब) फारच भयंकर! कल्पना येत नाही.

## विभाग ५ : उपयोजित लेखन

**प्र.५ अ) पुढील कृती सोडवा. (कोणतीही एक )**

**१) खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा.** **[६]**

## : मराठी सुलेखन वर्ग :

माफक फी

विनय ॲकॅडमी तर्फे

सुलेखन वर्गाचे आयोजन

**संपर्क : श्री. विनय गायकवाड.**

**२ सोमवार पेठ, कराड.**

**भ्रमणध्वनी** – ८८४४००१७००

| | | |
|---|---|---|
| विदयार्थी या नात्याने या वर्गात प्रवेश देण्याची विनंती | किंवा | विदयार्थी या नात्याने आई / वडिलांना प्रवेश घेण्यासंबंधी |

**किंवा**

**२) सारांश लेखन:** **[६]**

विभाग – १ गदय विभागातील प्र.१ (इ) मधील अपठित उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र.५ आ) पुढील कृती सोडवा. (कोणत्याही दोन )**

**१) खाली दिलेल्या मुद्दयांच्या आधारे कथा तयार करा.** [५]

**मुद्दे** – एक वडाचे झाड – कावळ्यांची वस्ती – सगळे कावळे एकत्र राहत – एका फांदीवर कावळ्यांची बाजारपेठ भरणे – अनेक कावळ्यांनी गरजेच्या वस्तू विकणे – एका चिमणीचे त्या झाडावर येणे – म्हाता-या कावळ्याकडे मध विकण्याची परवानगी मागणे – मध न संपणे – संध्याकाळी परत – हिरमुसली होणॆ – ज्याचा खप नाही ती वस्तू न संपणे – कावळ्याला मधाची चव काय? चिमणी मध घेऊन उडून जाणे – तात्पर्य.

**२) खालील जाहिरात वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.** **[५]**

**कलामंच छंदवर्ग**

**कलाविकास मंडळ आयोजित**

छंद म्हणजे जिवाचा विरंगुळा

छंद म्हणजे कलांचा विसावा

छंद म्हणजे प्राण माझा

छंदाविण मन कुठेही रमेना

- मुखवटे बनवणे.

- मेणबत्त्या बनवणे.
- मातीकाम.
- चित्रकला.

अशा छंदवर्गाचे आयोजन खास तुमच्यासाठी

वयोगट : ८ ते १५ वर्ष

कालावधी : दि. १५ मे ते २० मे

वेळ : सकाळी १०.०० ते दुपारी १.००



**संपर्क**

कलाविकास मंडळ

इंडियन एज्युकेशन सोसायटी,

परळ,

फोन – २६६५४५४.

**(प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी)**

**आकृतिबंध पूर्ण करा.** २

i) १) ← **छंद** → २)
↓
**प्राण माझा**

ii) वयोगट १) ← **छंदवर्ग** → कालावधी २) २

iii) छंदर्वगात प्रवेश देण्याची पद्धत कशी आहे? १

**३) खालील विषयावरून बातमी तयार करा.** [५]

शाळेत वसुंधरा दिनानिमित्त वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रम,

वनाधिकारी मा. श्री. शशिकांत राव यांच्या उपस्थितीत संपन्न.

**प्र.५ इ) पुढीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** [८]

**१) खालील चौकटीतील प्रसंग वाचून त्याआधारे प्रसंगलेखन करा.**

"हॅप्पी बर्थडे टू यू, मे गॉड ब्लेस यू, हॅप्पी बर्थडे टू यू," असा एकच गजर झाला आणि माझ्या डोळ्यांत पाणीच आले. आयुष्यात पहिल्यांदाच मी माझा वाढदिवस असा इतक्या सा-या मुलांसोबत साजरा करत होतो. मी तिथे पोहोचलो तेव्हा अनाथ, अनोळखी वाटणारी ती मुलं अचानक खूप आपलीशी वाटू लागली.

२) **खालील चित्रातील घटक (महामार्गावरील सूचनाफलक ) तुमच्याशी बोलतो आहे अशी कल्पना करा व त्या घटकांचे आत्मकथन लिहा.**

- वाहने हळू चालवा.
- पुढे एक किलोमीटरचा घाट आहे.
- गरज पडेल तेव्हा सतत कर्णभोंगा वाजवा.
- गतिरोधकावर वाहनाची गती कमी करा.

३) **पुढील मुद्दे विचारात घेऊन निबंध लेखन करा.**

